लोकसत्ता

शुक्रवार, २३ जुलै २०१०

# सुंदरमच्या 'ई-क्लास'ला उत्तम प्रतिसाद

■ व्यापार प्रतिनिधी

आज आधुनिक, विकसित होत असलेल्या भारतात शिक्षणाचे महत्त्व लक्षणीयरीत्या वाढू लागले असून सरकार आणि खासगी क्षेत्र सातत्याने शिक्षणाच्या नवनवीन आणि अद्ययावत पद्धतींचा शोध घेत आहे. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून शाळा आणि ऑफिस स्टेशनरीचे उत्पादक असलेल्या सुंदरम मल्टी पॅप लि.ने आपल्या 'ई-क्लास' या आधुनिक उत्पादनाच्या मदतीने वर्गशिक्षणाची संकल्पना बदलण्यामध्ये आघाडी घेतली आहे.

'ई-क्लास'ची संकल्पना आणि निर्मिती सुंदरम एज्युसीस प्रा. लि.ची असून ही सुंदरम मल्टी पॅप लि.ची भागधारक कंपनी आहे आणि महाराष्ट्र एसएससी बोर्डातील इयत्ता ८ वी ते १० दरम्यानच्या मुलांची गरज पूर्ण करते. या संकल्पनेत सुंदरम एका पेन ड्राईव्हसह येत असून यात संबंधित अभ्यासक्रमाची माहिती असते आणि ई-बॉक्स जो पेन ड्राईव्हला टीव्ही सेट, लॅपटॉप आणि प्रोजेक्टर समवेत जोडतो. पेन ड्राईव्हमध्ये डिजिटल भाषा वगळता सर्व अभ्यासक्रम साठवला जातो. तसेच याच्या २ डी आणि ३ डी मधील ऑडिओ-व्हिज्युअल सादरीकरणामुळे शिक्षण खूपच आकर्षक बनले असून विद्यार्थ्यांकडे अधिक प्रमाणात लक्ष पुरवणे शक्य होते. तसेच विद्यार्थ्यांना पाठांतर आणि घोकंपट्टी करण्यापासून परावृत्त करता येते. 'ई-क्लास' मराठी आणि इंग्रजी दोन्ही माध्यमात उपलब्ध आहे.

भारतात अंदाजे १.५३ दशलक्ष प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आहेत. यापैकी महाराष्ट्रामध्ये ९२,०५३ नोंदणीकृत शाळा आणि अंदाजे २६,०६९ खासगी शाळा असून त्यापैकी ७६,१५६ शाळा मराठी माध्यमाच्या आणि ४८०० शाळा इंग्रजी माध्यमाच्या आहेत. ग्रामीण भागात शाळांचा तसेच शिक्षकांचा तुटवडा असल्याचे वास्तव तसेच अधिकाधिक गुण मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांवर असलेला दबाव अशी आपल्या शिक्षणपद्धतीची लक्षणे आहेत. अशा परिस्थितीत 'ई-क्लास' विद्यार्थ्यांना दिलासा देणारे उत्तेजन ठरले आहे. वापरण्यास सोपे आणि सुलभ तंत्रज्ञान यामुळे शहरी तसेच ग्रामीण भागात हे लोकप्रिय बनले आहे. 'ई-क्लास' टीव्ही सेटसह उपलब्ध होत असून प्रोजेक्टरप्रमाणे वापरला जातो.

बालमोहन विद्यामंदिरने ई-क्लासरुम या अद्ययावत आणि संकल्पनेचा समावेश आपल्या इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता करून घेतला आहे. सुरुवातीला शाळेने इंग्रजी तसेच मराठी माध्यमातील दहावीच्या मुलांकरिता ९ क्लासरूम सुसज्ज करून घेतल्या आहेत. बालमोहन विद्यामंदिरचे संचालक आणि विश्वस्त गुरुप्रसाद रेगे यावेळी बोलताना म्हणाले, ''आम्ही भविष्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली असून ई-क्लासरुमची संकल्पना वास्तवात आणली आहे. आमचे शिक्षक हे ई-टेक्स्टिंगचे अद्ययावत साधन परिणामकारक, आनंदी आणि इंटरॅक्टिव्ह लर्निंगकरता वापरात आणत असून त्यासोबत पारंपरिक पद्धतीचे शिक्षणही तितकेच आवश्यक आहे. गुंतागुंतीच्या संकल्पना ग्राफिक आणि ॲनिमेशनच्या मदतीने सहजतेने समजून घेता येतात. ई-क्लासमध्ये असलेली सर्व सकारात्मक वैशिष्ट्ये पाहिली तरी आमच्या शिक्षकांऐवजी याचा वापर करता येणार नाही. आनंदी आणि परिणामकारक शिक्षणाचे ई-टेक्स्टबुक हे केवळ एक साधन आहे. ■